14 JAN 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पत्रकारांच्या सन्मान सोहळ्याची परंपरा गौरवास्पद

▪ कुलगुरु प्रा.डॉ. दिगंबर शिर्के यांचे प्रतिपादन

वार्ताहर
नावली

पत्रकारितेच्या क्षेत्रात आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्या स्मृती चिरंतन ठेवीत डॉ. प्रताप पाटील यांनी पत्रकारांसाठी एक हक्काचे व्यासपीठ निर्माण केले असून पत्रकारांच्या सन्मान सोहळ्याची ही परंपरा गौरवास्पद असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले. वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द येथील वृत्तपत्र विद्या व संवाद शास्त्र विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या पत्रकार सन्मान सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी त्रिपुरा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.वि. ल.धारूलकर हे होते तर माहिती अधिकारी सौ. वृषाली पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



नावली : कुलगुरु शिर्के यांचा सत्कार करताना प्राचार्य प्रताप पाटील, सोबत मान्यवर.

डॉ. शिर्के यांनी वारणा महाविद्यालयातर्फे अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्यात आले असून रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त महाविद्यालयाने पत्रकारितेशी संबंधित ऑनलाईन कोर्सेस सुरू करण्याचे आवाहन केले.

ग्रामीण पत्रकारितेला तांत्रिकतेची जोड मिळाल्यामुळे आता वारणा महाविद्यालयांमध्ये नव्याने छोटे छोटे कोर्सेस सुरू करण्याचे आवाहन यावेळी डॉ. धारूलकर यांनी केले.

माहिती अधिकारी वृषाली पाटील यांनी यावेळी पत्रकारांसाठी शासनाच्या विविध योजना व पुरस्कार प्रस्तावाची माहिती दिली.

प्रत्येक वर्षी देण्यात येणारा साहित्य प्राज्ञ स्वर्गीय बाजीराव बाळाजी पाटील सर्वोत्कृष्ट पत्रकार पुरस्कार यावेळी युनूस शेख व पन्हाळा तालुक्यातील पत्रकार निवास मोटे यांना प्रदान करण्यात आला. वारणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. पी. टी. पाटील, प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, प्रा. एस. के. पाटील, बाबासो पाटील, ए. एल. खराडे, जगन्नाथ पाटील यांचे सह सर्व विश्वस्त, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. सुरज चौगुले यांनी केले. सूत्रसंचालन सौ.प्रा. सुवर्णा आवटे, गणेश चांदणे,प्रा. रंजना मोरे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JAN 2024
तरुण भारत

# तंत्रज्ञानाच्या प्रगतीने भारत महासत्ता बनेल

■ माजी कुलगुरू डॉ. व्ही. एल. धारूरकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

सारे जग जेव्हा अंधारात होते तेव्हा भारत ज्ञान प्रकाशाने उजळून गेला होता. भारताने पारंपारिक अभ्यासाबरोबर विज्ञान-तंत्रज्ञानावर भर दिला पाहिजे. कारण तंत्रज्ञानाच्या प्रगतीनेच भारत महासत्ता बनेल, असे प्रतिपादन त्रिपुरा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. व्ही. एल. धारूरकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. धारूरकर म्हणाले, भारतामध्ये प्राचीन स्थापत्य अभियांत्रिकीचा जेवढा विकास झाला होता तेवढा जगात कुठेही विकास झाला नाही. २१ व्या शतकात प्रगत विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे राज्य करणार आहे. भारताची आदित्य एलवन सौर मोहीम तसेच उपग्रह निर्मिती आणि उड्डाणे क्षेत्रातील प्रगती याबद्दल माहिती दिली. निमशिरगाव येथील ज्येष्ठ नागरिक महावीर पाटील यांनीही आपले विचार मांडले. यावेळी डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. यु. एम. चौगुले, डॉ. एस. पी. दास, डॉ. ए. आर. पाटील, डॉ. एस. एस. पाटील आदी उपस्थित होते. भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. निलेश तरवाळ यांनी आभार मानले. सिद्धी पाटील आणि अक्षदा मोरे यांनी सूत्रसंचालन केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात त्रिपुरा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. व्ही. एल. धारूरकर यांचा सत्कार करताना विभागप्रमुख भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे**

14 JAN 2024 लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या खानापूर उपकेंद्राचे कामकाज जूनपासून

लोकसत्ता प्रतिनिधी

सांगली : येत्या जूनमध्ये सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून खानापूर येथे शिवाजी विद्यापीठाच्या उपकेंद्राचे कामकाज सुरू होऊ शकेल, अशी आशा विद्यापीठ अधिसभा सदस्य ॲड. वैभव पाटील यांनी सांगितले. विद्यापीठ नियुक्त समितीने मंगळवारी खानापूरला भेट देऊन स्थळ पाहणी केली.

समिती सोबत जागेबाबत चर्चा केल्यानंतर पाटील यांनी सांगितले, पाण्याची सुविधा, दळणवळणासाठी महामार्गालगतची जागा या बाबींचा विचार करता सुचविण्यात आलेली जागा योग्य असल्याचे मत समिती सदस्यांनी व्यक्त केले आहे. समितीचा अहवाल विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेसमोर दि. १५ जानेवारीपर्यंत मांडला जाईल. व्यवस्थापन परिषद, अधिसभा आणि उपकेंद्र समिती यांचा एकत्रित अहवाल राज्य शासनाकडे सादर झाल्यानंतर याबाबतचा अंतिम निर्णय होणार आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या उपकेंद्रासाठी खानापूरच्या जागेची पाहणी करण्यात आली.

यावेळी खानापूर येथील टेंभू कार्यालयामधील वापरात नसलेली इमारतीची पाहणी सुद्धा समितीने केली असून उपकेंद्र सुरू करताना सुरुवातीच्या काळात तेथील इमारत वापरण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनास देऊन येत्या जूनपासून हे उपकेंद्र खानापूर येथे सुरू करण्यासाठी समिती प्रयत्नशील राहील अशी माहिती पाटील यांनी दिली. या उपकेंद्रामध्ये कोणकोणते अभ्यासक्रम सुरू करावेत, त्यासाठी काय काय सुविधा आवश्यक आहेत, त्यासाठी आर्थिक अंदाजपत्रक कसे असावे याची संपूर्ण माहिती समिती व्यवस्थापन परिषदेसमोर मांडणार आहे.

समितीमध्ये अध्यक्ष डॉ. प्राचार्य व्ही.एम.पाटील आणि सदस्य म्हणून प्राचार्या डॉ. मेघा गुळवणी, डॉ. रघुनाथ ढमकले, ॲड. स्वागत परुळेकर, वैभव पाटील, विनिता तेलंग, काव्यश्री नलवडे, संजय परमने, विशाल गायकवाड, डॉ. प्रशांत खरात यांची विद्यापीठ व्यवस्थापन प्रशासनाने नियुक्ती केली आहे.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JAN 2024
पुण्यनगरी

# पीएच.डी. प्रवेशासाठी संशोधन तंत्र महत्वाचे : डॉ. पाटील

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी पीएच.डी. प्रवेश परीक्षेच्या तयारीसाठी विषयाच्या अभ्यासाबरोबर संशोधन पद्धतीचे तंत्र आत्मसात करणे महत्वाचे आहे, असे प्रतिपादन दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रातर्फे पीएच.डी. प्रवेश परीक्षेसाठी 'पीएच. डी. प्रवेश परीक्षा तयारी' याविषयावर ऑनलाईन स्वरुपात आयोजित कार्यशाळेच्या समारोपाच्या सत्रात 'संशोधन पद्धती' या विषयावर ते बोलत होते.




अध्यक्षीय स्थानावरून बोलताना संचालक डॉ. डी. के. मोरे म्हणाले, पीएच.डी. प्रवेश परीक्षेची तयारी करताना संशोधन पद्धतीचा मुलभूत अभ्यास गरजेचा आहे. प्रास्ताविक डॉ. सुशांत माने यांनी, सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. आभार डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी आभार मानले. यावेळी उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, सी. एस. कोतमिरे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JAN 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ हॉकी संघात सिद्धीची सलग पाचव्यांदा निवड

कोल्हापूर : ग्वाल्हेर (मध्यप्रदेश) येथे शनिवारपासून सुरु झालेल्या पश्चिम–दक्षिण विभागीय आंलरविद्यापीठ महिला हॉकी स्पर्धेसाठी निवडलेल्या शिवाजी विद्यापीठात संघात सिद्धी संदीप जाधव हिला स्थान मिळाले आहे. शिवाजी विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीत हॉकी स्पर्धेत छत्रपती शहाजी कॉलेजकडून कर्णधार म्हणून खेळताना सिद्धीने ४ गोल केले होते. फॉरवर्ड या प्लेसवरुन सामन्यात खेळताना तिने विरुद्ध संघावर आक्रमक चाली करुन दबदबा निर्माण केला. याच कामगिरीची दखल घेऊन तिला शिवाजी विद्यापीठ संघात स्थान देण्यात आले आहे. या स्पर्धेच्या रुपाने सिद्धी ही सलग पाचव्यांदा शिवाजी विद्यापीठ संघातून आंतरविद्यापीठ हॉकी स्पर्धेत प्रतिनिधीत्व करणार आहे.



तसेच सलग दुसऱ्यांदा विद्यापीठ संघाच्या कर्णधारपदाची धुरा तिच्याकडे सोपवली आहे. सिद्धी ही छत्रपती शहाजी कॉलेजमध्ये एमए भागमध्ये शिकत आहे. तिला शिवाजी विद्यापीठाचे हॉकी प्रशिक्षक संतोष जाधव व संदीप पाटील, शहाजी कॉलेजचे क्रीडा विभाग प्रमुख प्रशांत पाटील, प्रशांत मोटे व रणजित इंगवले, यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

जनसंपर्क कक्ष
14 JAN 2024
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाला ३५ कोटींचा निधी

प्रतिनिधी
कोल्हापूर

- उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पुण्यात ग्वाही
- निधी देण्याबाबत पालकमंत्री मुश्रीफ यांची आग्रही मागणी

शिवाजी विद्यापीठाला लवकरच ३५ कोटी रुपये निधी मिळणार आहे. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या आग्रही मागणीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ही ग्वाही दिली.

पुणे येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली व पुणे विभागातील पाच जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा नियोजन समित्यांची राज्यस्तरीय आढावा बैठक झाली. या बैठकीत मंत्री मुश्रीफ यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे ही मागणी केली. पवार यांनी तातडीने वित्त विभागाच्या मुख्य सचिवांना सूचना दिल्या आणि येत्या अर्थसंकल्पात हा निधी समाविष्ट करण्याचेही सांगितले. यासाठी पाठपुरावा केडीसीसी बँकेचे संचालक भैया माने, शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेचे माजी सदस्य प्रा. मधुकर पाटील यांनी केला होता.

**या उपक्रमांना मिळणार निधी**

यामधून नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीच्या मुख्य इमारतीसह मुलांचे वस्तीगृह, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, राजर्षी छत्रपती शाहू रिसर्च सेंटर अँड म्युझियम कॉम्प्लेक्स, कन्व्हेन्शन सेंटर, युवा विकास केंद्र, गोल्डन ज्युबिली फॅकल्टी हाऊस, लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासन कार्य होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JAN 2024
सकाळ

# आदित्य शेळके याची निवड

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाचा खेळाडू आदित्य शेळके याची पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली.



आदित्य शेळके

या स्पर्धा १९ ते २३ जानेवारी कालावधीत नांदेड येथे होतील. आंतरविद्यापीठ खो-खो सर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात त्याची निवड झाली आहे. तसेच त्याची अल्टिमेट खो-खो लीगसाठी राजस्थान संघात दीड लाख रुपये इतकी बोली लावून निवड झाली होती. त्याचा प्राचार्य डॉ. एस.एम. मणेर यांनी सत्कार केला शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मुजफ्फर लगीवाले, प्रा. विनायक भोई, प्रा. प्रशांत कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JAN 2024
पुढारी

# दीपाली पाटील हिची हॉकी स्पर्धेसाठी निवड



वडणगे : येथील दीपाली सरदार पाटीलने ग्वाल्हेर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला हॉकी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघामध्ये निवड झाली.

कुरुकली येथील भोगावती महाविद्यालयात ती महाविद्यालयीन शिक्षण घेत आहे. दीपालीला प्रशिक्षक मोहन भांडवले, प्रा. राहुल लहाने, सुनील खराडे, संतोष चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले.